**अमरावती जिल्हयातील पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क या प्रकल्पाच्या, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अमरावती यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दि. ११.०३.२०२४ रोजी बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे दुपारी १२.०० वाजता घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

---------------

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अमरावती यांचेकडून पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क प्रकल्पासाठी पर्यावरणीय अनुमती प्राप्त करण्याकरीता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला. पर्यावरण, वन व हवामान बदल, मंत्रालय (भारत सरकार) यांचे दि. १४.०९.२००६ च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार सदर लोकसुनावणी आयोजीत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. ११.०३.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, (भारत सरकार) आघात मुल्यांकन विभाग, नवी दिल्ली यांचे दि. ०९ जुन २०२१ रोजीचे ऑफिस मेमोरेन्डम मधील तरतुदी नुसार घेण्यात आली. सदर जाहिर लोकसुनावणीकरीता मा. सदस्य सचिव म.प्र.नि. मंडळ, मुंबई यांनी आदेश क्र. E-114 of 2024 पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-240213-FTS-0140 दि. १३.०२.२०२४ अन्वये लोकसुनावणी समीती गठन आदेश पारीत केलेला होता.

सदर जाहिर लोकसुनावणीस खालीलप्रमाणे जाहिर लोकसुनावणी समितीचे सदस्य उपस्थितीत होते.

१. मा. श्री अनिल भटकर, निवासी उपजिल्हाधिकारी, अमरावती — अध्यक्ष
२. श्री. सं. दे. पाटील, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अमरावती — सदस्य
३. श्रीमती धनश्री पाटील, उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अमरावती-१ — समन्वयक

सदर जाहिर लोकसुनावणी बाबतची सुचना दैनिक लोकमत (मराठी) व दैनिक टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रामध्ये अनुक्रमे दि. ०६.०२.२०२४ व दि. ०७.०२.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. ११.०३.२०२४ रोजी घेण्यात आली.

मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी तथा निवासी उपजिल्हादंडाधिकारी श्री अनिल भटकर यांचे परवानगीने लोकसुनावणी सुरू करण्यात आली. सर्वप्रथम लोकसुनावणी समितीचे समन्वयक श्रीमती धनश्री पाटील, उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अमरावती-१ यांनी सर्व उपस्थितीतांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क प्रकल्पासाठी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अमरावती यांनी सादर केलेले पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन अहवाल (EIA), कार्यकारी सारांश (इंग्रजी व मराठी) परीसरातील नागरीकांना/गावक-यांना/संबंधीत पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्थाना अवलोकनार्थ खालील ठिकाणी ठेवण्यात आलेले होते.

१. पर्यावरण ,वन व हवामान बदल ,मंत्रालय (भारत सरकार) ,प्रादेशिक कार्यालय-१०४-१२८ ,रेड क्रॉस , सदर रोड ,नागपुर.

२. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अमरावती विभाग, जुना बायपास रोड, अमरावती-४४४६०७.
३. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉइंट, तिसरा आणि चौथा मजला, समोर .सिने प्लॅनेट, सायन सर्कल जवळ, सायन) ई(, मुंबई-४०००२२).
४. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी बापटवाडी विवेकानंद कॉलनीजवळ, अमरावती – ४४४६०६.
५. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी बापटवाडी विवेकानंद कॉलनीजवळ, अमरावती – ४४४६०६.
६. जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.
७. जिल्हा परिषद, अमरावती.
८. जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती.
९. उपविभागीय कार्यालय, अमरावती.
१०. तहसील कार्यालय अमरावती.
११. ग्रामपंचायत कार्यालये, डिगरव्हाण, शिवणगाव, पिंपळविहीर, सावर्डी, माहुली जहांगीर, शेंदोला बु., सालोरा बु .नांदगावपेठ, केकतपूर ता .जि .अमरावती.

श्रीमती धनश्री पाटील, उपप्रादेशिक अधिकारी, अमरावती-१ यांनी प्रकल्प समन्वयक यांना पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याची विनंती केली. त्यानंतर प्रकल्प समन्वयक यांचे वतीने पर्यावरण सल्लागार यांनी सदर प्रकल्पाबाबत सादरीकरण दिले.

श्रीमती धनश्री पाटील, उपप्रादेशिक अधिकारी अमरावती-१ यांनी सांगीतले की, सदर पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क प्रकल्पाबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास एक लेखी स्वरूपात सुचना/आक्षेप प्राप्त झालेला आहे. तसेच त्यांनी सदर प्रस्तावाबाबत उपस्थितांच्या काही सुचना/आक्षेप असल्यास त्याप्रमाणे मांडावेत अशी विनंती उपस्थितांना केली.

श्री नंदकिशोर पाटील, रा. नांदगांव पेठ ता. जि. अमरावती यांनी विचारणा केली की, नांदगावपेठ औद्योगिक क्षेत्रात शितगृहाची काही व्यवस्था ठेवली आहे का ? यामध्ये ज्या लोकांची शेती गेलेल्या आहेत व जे लोक शेती करु शकत नाही व ज्यांचे नोकरीचे वय निघुन गेलेले आहे, त्यांच्यासाठी काही योजना आहे का ?

यावर श्री सुधीर अमृतकर, उप- अभियंता, म.औ.वि.मं. यांनी सांगितले की, ज्या लोकांची शेती नांदगावपेठ औद्योगिक क्षेत्रात गेली आहे त्यांच्याकरीता मऔविम तर्फे प्लॉट्स उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे त्यावर ते उद्योग करु शकतात.

श्री प्रविण बाजारे, रा. डिगरगव्हाण ता. जि.अमरावती यांनी सुचना केली की, डिगरगव्हाण गावाचा रस्ता औद्योगिक क्षेत्रातून जात असून औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यावर ब-याच प्रमाणात वाहतूक असल्यामुळे अपघात टाळण्याच्या दृष्टीकोणातून स्पीडब्रेकर्स देण्यात यावे. तसेच सदर रस्त्यावरील स्ट्रीट लाईट बंद असून ते दुरूस्त करून देण्यात यावेत.

यावर श्री सुधीर अमृतकर, उप अभियंता, म.औ.वि.मं. यांनी सांगितले की, अपघात टाळण्याच्या दृष्टीकोणातून आवश्यक त्या ठिकाणी स्पीड बेकर्स तयार करण्यात येतील. तसेच स्ट्रीट लाईट सुदधा दुरूस्त करण्यात येतील.

ज्ञानेश्वर बागडे (सेवानिवृत्त, व्यवस्थापक, महाराष्ट्र जिल्हा उद्योग कार्यालय, यवतमाळ) रा. माहुली जहांगीर ता. जि. अमरावती यांनी विचारणा केली की, त्यांची जमीन म.औ.वि.मं. क्षेत्रात असलेल्या संरक्षीत वनाकरीता अधिग्रहीत करण्यात आलेली आहे. मात्र त्याचा मोबदला कमी देण्यात आलेला आहे. प्लॉट्स देणेबाबत म.औ.वि.मं. कडे चौकशी केली असता योग्य प्रतिसाद मिळाला नाही. आम्हाला जर आमच्या जमीनी जवळ प्लॉट मिळाले तर मुला-बाळांना भविष्यासाठी काही करता येईल.

यावर श्री सुधीर अमृतकर, उप अभियंता, म.औ.वि.मं. यांनी सांगितले की, हे भुसंपान सन १९९२ मधील असून त्या वेळेला २८५ हेक्टर जमीन वन विभागाला सन १९९८-९९ मधे देण्यात आली होती. तथापी एकदा जमीन वनविभागाला दिल्यानंतर त्याचे अधिग्रहण आपण पुन्हा करु शकत नाही. परंतु म.औ.वि.मं. क्षेत्रातील लेआऊट मधुन भूखंड देणे शक्य हाईल. संबंधीतांनी प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती या कार्यालयाशी संपर्क साधावा असे त्यांनी सांगीतले.

श्री. मनिष काळबांडे, रा. नांदगावपेठ, ता.जि.अमरावती यांनी सांगीतले की, शासनाच्या योजनेनुसार १०००० एकर जमीनीचे अधिग्रहणपैकी १००० एकराचेच भूसंपादन करण्यात आलेले आहे. त्या भागातील ८ गावांच्या नजीकच्या जमीनी अधिग्रहण करणेबाबत सन २०१९ मधे जारी करण्यात आलेल्या अधिसुचनेनुसार उर्वरीत जमीनीच्या भूसंपादना बाबत शासनाचे काय धोरण आहे.

यावर श्री सुधीर अमृतकर, उप अभियंता, म.औ.वि.मं. यांनी सांगितले की, शासनाने निर्गमीत केलेल्या अधिसुचनेनुसार आजपावेतो ४१० हेक्टर जमीन ही प्रस्तावीत पी. एम. मित्रा पार्क या प्रकल्पाकरीता म.औ.वि.मं. यांनी अधिग्रहीत केलेली असून भविष्यात टप्या टप्याने जमीन अधिग्रहीत करण्याचे शासनाचे धोरण आहे.

श्री अब्दुल शेख, रा. माहुली जहांगीर ता.जि.अमरावती सांगीतले की, माझी जमीन म.औ.वि.मं. क्षेत्रमध्ये गेलेली आहे. जमीनीच्या मोबदल्याचा पहीला टप्पा भेटला परंतु अजुनही दुसरा टप्पा भेटलेला नाही.

यावर श्री सुधीर अमृतकर, उप-अभियंता, म.औ.वि.मं. यांनी सांगितले की, त्यांची शेत जमीन सन १९९२ च्या अधिसुचनेनुसार संपादन केलेली आहे. त्यावेळेस त्यांचे जमीनीचा मोबदला दिलेला आहे. तरीसुद्धा याबाबत प्रादेशिक अधिकारी, म.औ.वि.मं., अमरावती यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

श्री मनोज हटवार, रा. नांदगांव पेठ ता.जि.अमरावती यांनी विचारणा केली की, ज्या ठिकाणी पी. एम. मित्रा पार्क असणार आहे तो म.औ.वि.मं. च्या क्षेत्रात आहे. सन १९९२ मध्ये आम्हाला २८ हजार रुपये मिळाले. ६ एकर शेतीचे आणि आणखी बाकी पैसे भेटलेच नाही तर तुम्ही तेथे प्रकल्प कसा काय उभारू शकता.

यावर श्री सुधीर अमृतकर, उप अभियंता, म.औ.वि.मं. यांनी सांगितले की, ४१० हेक्टर क्षेत्रफळ असलेल्या प्रस्तावित पी. एम. मित्रा पार्क मधे आपली जमीन गेली असेल तर आपल्याला मोबदला मिळायलाच पाहीजे. परंतु सदर जमीन जर सन १९९२ मध्ये ज्या जमीनी गेल्या त्यामध्ये असेल तर आपल्याला वाढीव मोबदल्याकरीता प्रादेशिक कार्यालय, मऔविम, अमरावती यांचेकडे शहानीशा करण्याकरीता संपर्क साधावा लागेल.

श्री अशोक बागडे, रा. माहुली जहांगीर ता.जि. अमरावती यांनी सांगीतले की, माझी जी जमीन होती ती 4 एकर होती त्याचा मोबदला बरोबर मिळालेला नाही. माझी जमीन भारी होती, त्यात विहीर,

आंब्याची झाडे होती तसेच माझे शेजारी आहेत त्यांना सुध्दा बरोबर मोबदला मिळालेला नाही. फक्त टप्पा मिळालेला आहे. काही लोकांना दोन्ही टप्पे मिळाले आम्हाला नाही. आम्ही वाढीव मोबदल्यासाठी केस दाखल केलेली आहे. केस चालू आहे. केसमध्ये साहेब कधी येतात तर कधी येत नाही, कधी जज साहेब नसतात अशाप्रकारे टाळाटाळ सुरु आहे. याचा निकाल कधी लागेल. भुजाळगांव येथे माझी जमीन आहे.

यावर श्री सुधीर अमृतकर, उप अभियंता, म.औ.वि.मं. यांनी सांगितले की, हा कार्यक्रम पर्यावरण विषयक सुनावणीचा आहे. त्यामुळे जमीनीसंबंधी आपल्या तक्रारी सोडवण्यासाठी आपण प्रादेशीक कार्यालय, म.औ.वि.म. अमरावती यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

श्री नंदकिशोर पाटील, रा. नांदगांव पेठ ता.जि.अमरावती यांनी सांगीतले की, माझी सर्व मान्यवरांना अशी विनंती आहे की, शेतकऱ्यांचा प्रश्न सुटला पाहीजे त्याच्या समस्यांच निवारण झाल पाहीजे. शेतक-यांचे प्रश्न सोडविण्याकरीता बैठक लावण्यात यावी. नाहीतर विकास व्हावा असे कोणाला नाही वाटत, सर्वांना वाटते की, औद्योगिकीकरण झाले पाहीजे व रोजगार मिळाला पाहीजे.

श्री चेतन प्र. वानखडे, रा. डिगरगव्हाण, ता.जि. अमरावती यांनी सांगीतले की, माझे शेत सर्व्हे क्र. १२१ हे म.औ.वि.म. च्या पी.एम.मित्रा पार्क मध्ये गेले आहे व शेत जमीन क्र. ११४ हे शिल्लक आहे. आता सर्व्हे क्र. ११४ मध्ये जर आम्ही पिक घेतले तर त्याच्यावर प्रदुषणाचा काय परिणाम होईल, त्याच्याकरीता काही उपाययोजना आहे का?

यावर श्री सुधीर अमृतकर, उप-अभियंता, म.औ.वि.मं. यांनी सांगितले की, सद्यस्थीतीत अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्रात १०८० हे. क्षेत्रावर वस्त्रोद्योग संकूल विकसीत करण्यात आलेले आहे. त्यामध्ये बरेचसे वस्त्रोद्योग निर्मीती प्रकल्प कार्यरत आहे. सदयस्थितीत प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या आदेशान्वये सदर सामाईक सांडपाणी केंद्र शुन्य विसर्ग तत्वावर चालविणे सुरु आहे. त्यामुळे आपल्या उर्वरीत क्षेत्रात असलेल्या शेतीवर प्रदुषणाचा परिणाम संभवत नाही.

मा. अध्यक्षांचे परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन सदर जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| ( धनश्री पाटील ) | ( संजय पाटील ) | ( अनिल भटकर ) |
| समन्वयक | सदस्य | अध्यक्ष, लोकसुनावणी समिती |
| तथा | तथा | तथा |
| उप- प्रादेशिक अधिकारी | प्रादेशिक अधिकारी | निवासी उपजिल्हाधिकारी, अमरावती |
| म.प्र.नि.मंडळ, अमरावती-१ | म.प्र.नि.मंडळ, अमरावती | |